आणि सांगितलें कीं हा मणि तूं शुचिर्भूतपणानें धारण करीत जा ॥ २९ ॥ एके दिवशीं प्रसेन तो उत्तम मणि गळ्यांत घालून घोड्यावर बसून मृगया करण्याकरितां श्रीकृष्णाबरोबर अरण्यांत गेला ॥ ३० ॥ त्या वेळीं तो प्रसेन कंठांत मणि असून घोड्यावर बसलेला अशुचि असा असल्यामुळें " सूर्याच्या सांगण्याप्रमाणें " नाश पावला. एका सिंहाची गांठ पडून त्यानें तत्काल

एकदाकंठदेशेसौक्षिप्त्वातंमणिमुत्तमं ॥ मृगयाक्रीडनार्थायययौकृष्णेनसंयुतः ॥ ३० ॥ अश्वारूढोऽशुचिश्चासौहतःसिंहेनतत्क्षणात् ॥ रत्नमादायसिंहोपिगच्छन्जांबवताहतः ॥ ३१ ॥ नीत्वासविवरेरत्नंददौपुत्रायजांबवान् ॥ पुरींविवेशकृष्णोपिस्वकैःसर्वैःसमावृतः ॥ ३२ ॥ ॥

त्याला ठार मारिलें आणि त्याच्या गळ्यांतील मणि घेऊन तो चालला, इतक्यांत त्या सिंहाची व आस्वलांचा राजा जांबवान् याची गांठ पडली, तेव्हां जांबवंतानें सिंहास मारिलें आणि त्याच्या जवळचा तो मणि घेऊन ॥३१॥ आपल्या गुहेंत नेऊन पुत्राला खेळण्याकरितां दिला, मृगयेच्या नादांत प्रसेनाची काय व्यवस्था झाली हें कृष्णाला मुळींच माहित नव्हतें. बहुत वेळ शिकार

खेळून कृष्ण आपल्या इष्टमित्रांसह परत द्वारकेंत आला ॥ ३२ ॥ प्रसेन कृष्णाबरोबर गेला होता तेव्हां कृष्ण आला असून प्रसेन अद्याप आला नाहीं यामुळें मोठी काळजी लागून सत्राजित म्हणूं लागला कीं, मण्याच्या लोभानें त्या पापी कृष्णानें माझ्या बंधूला मारिलें यांत संशय नाहीं. हाय हाय! आतां काय करावें! ॥ ३३ ॥ द्वारकेंतील लोकही परस्पर त्याचप्रमाणें बोलूं लागले हें वर्तमान कृष्णाला समजलें. तेव्हां आपल्यावर खोटा अपवाद आला हें पाहून त्याला फार

प्रसेनोद्यापिनायातिहतःकृष्णेननिश्चितं ॥ मणिलोभेनहाकष्टंबांधवःपापिनाहतः ॥ ३३ ॥ द्वारकावासिनःसर्वेजनाऊचुःपरस्परं ॥ वृथापवादसंतप्तःकृष्णोपिनिरगाच्छनैः ॥ ३४ ॥ सहैवतैर्यथारण्येदृष्ट्वासिंहेनपातितं ॥ प्रसेनंवाहनयुतंतत्पदानुचरःशनैः ॥ ३५ ॥ ॥

वाईट वाटून तो प्रसेनाचा शोध लावण्याकरितां कोणास नकळतां निघून गेला ॥ ३४ ॥ त्याचे बरोबर कांहीं लोक निघाले, त्यांसहवर्तमान तो श्रीकृष्ण अरण्यामध्यें जाऊन शोधूं लागला तों घोड्यासहित प्रसेनाचें प्रेत पाहून याला सिंहानें मारिलें असावें असा तेथें लागलेल्या सिंहाच्या पावलांवरून निश्चय करून त्या पावलांवरूनच सिंहाचा हळुहळू माग काढीत चालला ॥३५॥

तों पुढें आस्वलानें मारिलेला सिंह दृष्टीस पडला. मग आस्वलाच्या पावलांच्या मागानें त्याच्या बिळापर्यंत जाऊन तेथें सर्व मंडळी ठेवून स्वतः श्रीकृष्ण एकटाच त्या आस्वलाच्या बिळांत शिरला. ती गुहा शंभर योजनें (४०० कोस) लांब होती. तेथें अंधकार गच्च भरला होता तरी श्रीकृष्णानें आपल्या तेजानें त्याचा ॥ ३६ ॥ नाश करीत शेवटपर्यंत गमन केलें. तों पुढें उत्तम

ऋक्षेणनिहतंदृष्ट्वाकृष्णश्चर्क्षबिलंगतः ॥ विवेशयोजनशतमंधकारंस्वतेजसा ॥ ३६ ॥ निवारयन्ददर्शाग्रेप्रासादंबद्धभूमिकं ॥ तंकुमारंजांबवतोदोलायाममितद्युतिं ॥ ३७ ॥ माणिक्यंलंबमानंचददर्शभगवान्हरिः॥ रूपयौवनसंपन्नांकन्यांजांबवतींपुनः ॥ ३८ ॥ ॥

तयार केलेला एक बंगला त्याच्या दृष्टीस पडला व तेथें लहान मुलाचा एक पाळणा टांगलेला असून त्यांत मोठा तेजस्वी असा जांबुवंताचा पुत्र निजला आहे ॥ ३७ ॥ व स्यमंतक मणि त्या मुलाला खेळण्याकरितां पाळण्याला टांगलेला आहे असें भगवान् श्रीकृष्ण याणें पाहिलें व जवळच एक तारुण्य व उत्तम रूप यांणीं संपन्न अशी जांबवंताची कन्या ॥ ३८ ॥

त्या पाळण्यास झोंके देत होती तिला त्या कमलाक्ष भगवान् श्रीकृष्णानें पाहिलें तेव्हां तो त्या सुंदर हास्ययुक्त मुलीला पाहून मोठें आश्चर्य करूं लागला. तों ती मुलगी पाळण्याला झोंके देतां देतां याप्रमाणें (पुढें सांगितल्याप्रमाणें) वारंवार गीत गाऊं लागली ॥ ३९ ॥ गीताचा अर्थ— सिंहें प्रसेन वधिला, जांबवंतें तो मारिला, रडूं नको तूंहि मुला, तुझाची हा स्यमंतक ॥४०॥ असें

दोलांदोलयमानाचददर्शकमलेक्षणः॥विस्मयंतुमहच्चक्रेदृष्ट्वातांचारुहासिनीं ॥ दोलांदोलयमानाचजगौगीतमिदंमुहुः ॥३९॥ सिंहःप्रसेनमवधीत्सिंहोजांबवताहतः॥ सुकुमारकमारोदीस्तवह्येषस्यमंतकः ॥४०॥ मदनज्वरदाहार्तादृष्ट्वा तंकमलेक्षणं॥ उवाचललितंबालागम्यतांगम्यतामिति॥४१॥ रत्नंगृहीत्वावेगेनयावच्छेतेतुजाम्बवान् ॥ इत्याकर्ण्यहसन्शौरिःशंखंदध्मौप्रतापवान् ॥४२॥

गीत ह्मणत आहे तों त्या मुलीची दृष्टि श्रीकृष्णाकडे गेली, तेव्हां त्याच्या रूपानें मदनपीडित होऊन मधुर वाणीनें ह्मणाली. अहो, तुह्मी लवकर येथून निघून जा निघून जा ॥ ४१ ॥ जोंपर्यंत माझा पिता जांबवान् निजला आहे तोंपर्यंत हें रत्न घेऊन निघून जा. असें तिचें वचन श्रीकृष्णानें ऐकिलें, तेव्हां किंचित् हास्य करून आणि मोठ्या जोरानें त्यानें आपला शंख वाजविला ॥४२॥

शंखाचा शब्द श्रवण करितांच तो आस्वलांचा राजा जांबवान् एकाएकीं जागा होऊन कृष्णाशीं लढूं लागला. त्या उभयतांचें मोठें भयंकर युद्ध झालें ॥४३॥ तिकडे जे कृष्णाच्या बरोबरचे द्वारकेंतील लोक गुहेच्या द्वाराशीं बसले होते ते सहा दिवस वाट पाहून गुहेंत आस्वलानें कृष्णास भक्षिलें असावें किंवा कृष्ण आंत घुस्मटून खचित मेला असावा असा निश्चय करून परत द्वारकेस

आकर्ण्यसहसोत्थाययुयुधेऋक्षराट्ततः ॥तयोर्युद्धमभूद्घोरंहरिजांबवतो स्तदा ॥ ४३ ॥ द्वारकावासिनःसर्वेगतास्तेसप्तमेदिने ॥ मृतःकृष्णोनिरी क्षन्तोनिःसंदिग्धंविचार्यच ॥४४॥ परलोकक्रियांचक्रुःपरेतस्यतुतेतदा ॥ एकविंशद्दिनंयावद्बाहुप्रहरणोविभुः ॥ ४५ ॥ युयुधेतेनऋक्षेणयुद्धकर्मणि तोषितः ॥ जांबवान्प्राक्तनंस्मृत्वादृष्ट्वादेवबलंमहत् ॥ ४६ ॥ ॥

गेले॥४४॥परलोकवासी झालेल्या कृष्णाची त्यांणीं यथाविधि उत्तरक्रिया केली.इकडे श्रीकृष्णानें गुहेंत एकवीस दिवसपर्यंत बाहुयुद्ध ॥ ४५ ॥ त्या जांबवंताशीं केलें तेव्हां त्याच्या पराक्रमानें व युद्धकौशल्यानें तो आस्वलांचा राजा जांबवान् फार संतुष्ट झाला.आणि त्याला पूर्वींच्या गोष्टीची आठवण झाली.व त्याणें श्रीकृष्ण हा सामान्य मनुष्य नसून साक्षात्ईश्वर आहे असें जाणलें॥४६॥

जांबवान् श्रीकृष्णास म्हणाला, हे देवा, मी सर्व देव, दैत्य, यक्ष, राक्षस, दानव यांना अजिंक्य असूनही तूं आज मला जिंकलें यावरून खचित तूं सर्व देवांचा ईश्वर आहेस ॥४७॥ तं साक्षात् विष्णु आहेस हें मी जाणतों; नाहींतर इतकें बल दुसऱ्याच्या अंगीं असणार कोठून? अशा भाषणानें श्रीकृष्णाला प्रसन्न करून जांबवंतानें तें उत्तम रत्न (स्यमंतकमणि) त्याला अर्पण

जांबवानुवाच ॥ अजेयोहंसुरैःसर्वैर्यक्षराक्षसदानवैः ॥ त्वयाजितोहंदेवेशदे वस्त्वमसिनिश्चितं ॥ ४७॥ जानेत्वांवैष्णवंतेजोनान्यथाबलमीदृशं ॥ इतिप्र साद्यदेवेशंददौमाणिक्यमुत्तमं ॥ ४८ ॥ सुतांजांबवतींनामभार्यार्थंवरवर्णि नीम् ॥ पाणिंवैग्राहयामासदेवदेवंचजांबवान् ॥ ४९ ॥ मणिमादायदेवोपि जांबवत्यापिसंयुतः ॥ तद्वृत्तांतंसमाचष्टेद्वारकावासिनांस्वयं ॥ ५० ॥ ॥

केलें ॥ ४८ ॥ आणि तो जांबवान् जी श्रेष्ठ पुरुषांनीं वरण्यास योग्य अशी जांबवतीनामक आपली कन्या ती त्यास स्त्री करण्याकरितां देऊन त्या देवदेवाकडून तिचें यथाविधि पाणिग्रहण करविता झाला ॥ ४९ ॥ नंतर तो भगवान् श्रीकृष्ण स्यमंतकमणि घेऊन जांबवतीसह-

गण०

॥२४॥

वर्तमान मोठ्या आनंदानें परत आपल्या नगरींत आला. त्यानें घडललें सर्व वर्तमान द्वारकावासी लोकांना स्वतः सांगितलें ॥ ५० ॥ नंतर श्रीकृष्णानें सभा करून त्या सभेंत सत्राजिताला बोलावून सर्वांच्या समक्ष तें स्यमंतक रत्न त्याच्या स्वाधीन केलें. आणि तो श्रीकृष्ण आपण मिथ्यापवादापासून मुक्त झाला ॥ ५१ ॥ याप्रमाणें सत्राजिताला स्यमंतक मणि पुन्हा

कथा.

सत्राजितस्यमाणिक्यंदत्तवान्संसदिस्थितः ॥ मिथ्यापवादसंशुद्धिंप्राप्त वान्मधुसूदनः ॥ ५१ ॥ सत्राजितोपिसंत्रस्तःकृष्णायप्रददौसुतां ॥ सत्यभामांमहाबुद्धिर्ददौसर्वगुणान्वितां ॥ ५२ ॥ शतधन्वाक्रूरमुख्यायाद वादुष्टमानसाः ॥ सत्राजितेनतेवैरंचक्रूरत्नाभिलाषिणः ॥ ५३ ॥ ॥

मिळाला. नंतर तो महाबुद्धिवान् सत्राजितही आपण श्रीकृष्णावर घातलेल्या खोटे आळेपासून भय पावून श्रीकृष्णाच्या मनांतील राग जावा झणून सर्वगुणयुक्त जी आपली सत्यभामानामक कन्या ती श्रीकृष्णास अर्पण करिता झाला ॥ ५२ ॥ नंतर शतधन्वा, अक्रूर इत्यादि दुष्टबुद्धि कांहीं यादव स्यमंतकमण्याच्या इच्छेनें त्या सत्राजिताशीं वैर करून त्याला मारण्याची संधी

॥२४॥

पाहूं लागले ॥५३॥ तों एके समयीं श्रीकृष्ण द्वारकेंतून बाहेर (हस्तनापुराकडे) गेला असतां ती संधि पाहून पापबुद्धि दुरात्मा शतधन्वा यानें सत्राजितास ठार मारिलें आणि त्याच्या जवळचा स्यमंतक मणि हरण केला ॥ ५४ ॥ त्या वेळीं सत्यभामा माहेरीं झणजे सत्राजिताच्याच घरीं होती. तिनें लागलेंच श्रीकृष्ण होता तेथें जाऊन आपल्या बापाचा दुष्टांनीं कसा वध केला

दुरात्माशतधन्वापिगतेकृष्णेथपांडवान् ॥ सत्राजितंनिहत्याशुमणिंजग्राहपापधीः ॥ ५४ ॥ कृष्णस्यपुरतःसत्यासमाचष्टेविचेष्टितं ॥ अंतर्हृष्टोबहिःकोपीकृष्णःकपटनायकः ॥५५॥ बलदेवंपुरोवाक्यमुवाचधरणीधरः ॥ हत्वासत्राजितंदुष्टोमणिमादायगच्छति ॥ ५६ ॥ निहत्यशतधन्वानंगृहीत्वारत्नमावयोः ॥ ममभोग्यंचतद्रत्नंभविष्यतिसुनिश्चितं ॥ ५७ ॥ ॥

तें सर्व वर्तमान कृष्णास सांगितलें. कृष्ण कपटनायकच होता, त्याला ही गोष्ट ऐकून एकप्रकारें समाधान वाटलें, तरी बाहेरून त्यानें अतिशय क्रोधाचा आवेश दाखविला ॥ ५५ ॥ आणि तो बलरामाजवळ असें झणाला कीं, दादा, दुष्ट शतधन्वा सत्राजितास मारून मणि घेऊन जात आहे ॥ ५६ ॥ तर त्या शतधन्व्यास मारून तें रत्न आपण घेऊं या. कारण तें आपलेंच

५

आहे. सत्राजिताचें तें रत्न आतां खरोखर आपणास मिळालें पाहिजे ॥५७॥ याप्रमाणें जें कृष्ण बोलला तें शतधन्व्याच्या कानावर गेलें, तेव्हां तो अत्यंत भयभीत होऊन त्यानें अक्रूराला बोलावून तो स्यमंतक मणि त्याचे हवालीं केला ॥ ५८ ॥ आणि आपण फार त्वरित चालणाऱ्या अशा घोडीवर बसून दक्षिण दिशेला पळत सुटला.तेव्हां बलराम आणि कृष्ण हे उभयतां रथावर

एतच्छ्रुत्वाभयत्रस्तोशतधन्वापियादवः ॥ आहूयाक्रूरनामानंमाणिक्यंप्र
ददौचसः ॥ ५८ ॥ आरुह्यवडवांवेगान्निर्गतोदक्षिणांदिशं ॥ रथस्थाव
नुगच्छेतांतदारामजनार्दनौ ॥ ५९ ॥ शतयोजनमात्रेणममारवडवात
दा ॥ पलायमानोनिहतःपदातिस्तुपदातिना ॥ ६० ॥ ॥

बसून त्याचे पाठीं लागले ॥ ५९ ॥ शतधन्वा पुढें व राम कृष्ण त्याच्या मागें याप्रमाणें जातां जातां शंभर योजनें गेले. शेवटीं फार चालल्यामुळें श्रमानें शतधन्व्याची घोडी एकाएकीं मरण पावली. तेव्हां शतधन्वा मरणाचे भयानें पायींच पळूं लागला. तो पायीं पळतो आहे असें पाहून कृष्ण रथावरून उतरून पायीं धांवत एकटाच त्याच्या पाठीस लागला आणि त्याला गांठून

कृष्णानें तत्काळ त्याचा शिरश्छेद केला व त्याच्या वस्त्रांत मण्याचा शोध केला परंतु मणि मिळाला नाहीं ॥६०॥ इकडे बलराम रथावरच बसला होता, तेथें कृष्ण परत येऊन बलरामाला ह्मणाला, दादा, स्यमंतक मण्याचे लोभानें आह्मीं शतधन्व्याला निरर्थक मारला. कारण त्याच्याजवळ मणि मुळींच मिळाला नाहीं ॥ ६१ ॥ तें कृष्णाचें भाषण ऐकून बलराम फारच रागावला आणि

रथस्थेबलदेवेतुहतोरत्नस्यलोभतः ॥ नदृष्टंतत्रतद्रत्नंबलदेवंपुरोवदत्
॥ ६१ ॥ तदाकर्ण्यमहारोषादुवाचवचनंबली ॥ कपटीत्वंसदाकृष्णलो
भीपापीसुनिश्चितं ॥ ६२ ॥ अर्थायस्वजनंहंसिकस्त्वांबंधुःसमाश्रयेत् ॥
अनेकैःशपथैःकृष्णोबलदेवंप्रसादयन् ॥ ६३ ॥ ॥

ह्मणाला; कृष्णा तूं सर्वकाळ फार कपटी आहेस, मोठा लोभी आहेस व अत्यंत पापी आहेस, यांत कांहीं संशय नाहीं ॥ ६२ ॥ केवळ द्रव्याच्या लोभानें आपल्या कुळांतल्या मनुष्याचा घात करितोस तेव्हां तुला आपल्या बंधुवर्गांतून कोण अनुसरेल ? हें बलरामाचें भाषण ऐकून कृष्णानें त्याची खातरी ह्मणून शेंकडों आणा शपथा घेतल्या ॥ ६३ ॥

गण०

॥२६॥

कथा॰

तेव्हां त्याचें मन अंमळ शांत झालें. समूळ राग नाहींसा झाला नाहीं. मग शतधन्व्याला व्यर्थ मारिल्याबद्दल दुःख दाखवून धिक्कार असें बोलून बलराम कांहीं दिवस विदर्भ देशांत संचार करण्याकरितां गेला व कृष्ण आपल्या रथांत बसून द्वारकेंत आला ॥ ६४ ॥ तरी सर्व लोक ह्मणूं लागले, हा कृष्ण मोठा दुष्ट आहे, यानें शतधन्व्याला मारून रत्न आपण बळकावलें आणि त्या

सोपिधिक्कष्टमित्युक्त्वाययौवैदर्भमंडलं ॥ कृष्णोपिरथमारुह्यद्वारकांप्रययौ पुनः ॥६४॥ तथैवोचुर्जनाःसर्वेनसाधीयानयंहरिः ॥ निष्काशितोरत्नलो भाज्ज्येष्ठोभ्राताबलोबली ॥ ६५ ॥ तच्छ्रुत्वादीनवदनःपापीयानिवसंस्थि तः ॥ वृथाभिशापसंतप्तोबभूवसजगत्पतिः ॥६६॥ अक्रूरोपिविनिष्क्रम्य तीर्थयात्रानिमित्ततः ॥ काशींगत्वासुखेनासौयज्ञेयज्ञपतिंप्रभुं ॥ ६७ ॥

॥२६॥

निमित्तानें आपला वडील बंधु बलराम यालाही घालवून दिलें ॥ ६५ ॥ तें लोकांचें भाषण ऐकून तो जगत्पति श्रीकृष्ण त्या खोट्या आळीच्या योगानें संतप्त होऊन एखाद्या अपराध्यासारखा दीनवदन होऊन राहिला ॥ ६६ ॥ स्यमंतक मणि अक्रूराजवळ ठेविला होता हें पूर्वीं

सांगितलेंच आहे. कृष्णानें शतधन्व्याला मारला हें समजतांच अक्रूरही कृष्णाच्या भीतीनें तीर्थयात्रेचें निमित्त करून द्वारकेंतून निघून काशींत जाऊन स्यमंतक मण्यापासून उत्पन्न होणाऱ्या द्रव्यानें मोठ्या आनंदानें यज्ञपति प्रभूची आराधना करून त्यास संतुष्ट करिता झाला. तो मोठा बुद्धिमान् असल्यामुळें त्यानें अनेक देवालयें, धर्मशाळा, उत्तम उत्तम घरें वगैरे बांधून तें काशी-

तोषमुत्पादयामासतेनद्रव्येणबुद्धिमान् ॥ सुरालयगृहैश्चित्रैर्नगरंसमक ल्पयत् ॥ ६८ ॥ नदुर्भिक्षंनवैरोगाईतयोनचविड्वरं ॥ शुचिनाधार्यतेय त्रमणिःसूर्यस्यनिश्चितं ॥६९॥ जानन्नपिहितत्सर्वंमानुषंभावमाश्रितः ॥ लोकाचारंतथामायामज्ञानंचसमाश्रितः ॥ बंधुवैरंसमुत्पन्नंलांछनंसमुप स्थितं ॥ ७० ॥ ॥ ॥

नगर सुशोभित केलें ॥ ६७ ॥ ६८ ॥ सूर्यनारायणाचा तो स्यमंतक मणि जेथें शुचिर्भूतपणानें बाळगला जात आहे तेथें कधींहि दुर्भिक्ष, रोग, अतिवृष्टि, अनावृष्टि हीं व्हायचीं नाहींत. तसेच इतर कोणतेही उत्पात व्हायचे नाहींत. त्याप्रमाणें स्यमंतक घेऊन अक्रूर काशींत राहूं लागला तेव्हांपासून तेथें कोणतेंच अरिष्ट येईना असें झालें ॥६९॥ अक्रूर काशींत आहे व स्यमंतक मणि

त्याच्या जवळ आहे हें सर्वांतर्यामी कृष्ण जरी जाणत होता तरी त्यानें मनुष्यभावाचा आश्रय केलेला असल्यामुळें लोकाचार, माया, आणि अज्ञान यांस धरून सामान्य मनुष्यासारखा चिंता करूं लागला. ती अशी कीं, बंधूंमध्यें वैर उत्पन्न झालें, वृथा लांछन आलें ॥ ७० ॥ एकामागून एक असे अनेक वृथापवाद येत आहेत, आतां हें सर्व कसें नाहींसें होईल अशी चिंता करीत बसला असतां नारदऋषि प्राप्त झाला ॥ ७१ ॥ तेव्हां कृष्णानें त्याची पूजा करून त्याला सुखा-

वृथापवादबहुलंजायमानंकथंहरेत् ॥ इतिचिंतातुरंकृष्णंनारदःसमुपस्थितः ॥ ७१ ॥ गृहीत्वातत्कृतांपूजांसुखासनगतोब्रवीत् ॥ नारदउवाच ॥ किमर्थंखिद्यसेदेवकिंवातेशोककारणम् ॥७२॥ यथावृत्तंसमाचष्टनारदायचकेशवः ॥ जानामिकारणंदेवयदर्थंलांछनंतव ॥ ७३ ॥ ॥

सनावर बसविलें. कृष्णाची चिंतातुर मुद्रा पाहून त्याला नारद ह्मणाला; हे देवा श्रीकृष्णा, तूं कशाकरितां खिन्न झाला आहेस, तुला शोकाचें कारण काय ? ॥ ७२ ॥ असा नारदाचा प्रश्न ऐकून कृष्णानें जशी गोष्ट झाली होती तशी मुळापासून सर्व त्याला सांगितली. तेव्हां नारद ह्मणाला; देवा, तुझ्यावर असे हे लोकापवाद कां आले हें मी जाणतों ॥ ७३ ॥

तूं भाद्रपदशुक्ल चतुर्थीचे दिवशीं चंद्राचें दर्शन केलें ह्मणून तुझ्यावर हें वृथा लांछन प्राप्त झालें ॥ ७४ ॥ तें ऐकून श्रीकृष्ण ह्मणाला, नारदा, त्या दिवशीं चंद्रदर्शन केलें असतां कोणता दोष लागतो व शुक्ल द्वितीयेचे दिवशीं चंद्राचें मुद्दाम दर्शन कां करितात तें मला सत्वर सांग ॥७५॥ याप्रमाणें कृष्णाचा प्रश्न ऐकून नारदऋषि ह्मणाला, चंद्र आपल्या रूपाच्या गर्वानें अगदीं फुगला

त्वयाभाद्रपदेशुक्लेचतुर्थ्यांचंद्रदर्शनं॥ कृतंतेनसमुत्पन्नंलांछनंतुवृथैवहि॥७४॥ श्रीकृष्णउवाच ॥ वदनारदमेशीघ्रंकोदोषश्चंद्रदर्शने ॥ किमर्थंतुद्वितीयायांतस्यकुर्वंतिदर्शनं ॥७५॥ नारदउवाच ॥ गणनाथेनसंशप्तश्चंद्रमारूपगर्वतः ॥ त्वद्दर्शनेनराणांहिवृथानिंदाभविष्यति ॥ ७६ ॥ श्रीकृष्णउवाच ॥ किमर्थंगणनाथेनशप्तश्चंद्रःसुधामयः ॥ इदमाख्यानकंश्रेष्ठंयथावद्वक्तुमर्हसि ॥ ७७ ॥

होता ह्मणून गणपतीनें त्याला असा शाप दिला कीं, जो मनुष्य तुझें दर्शन घेईल त्याला व्यर्थ लोकापवाद लागेल ॥७६॥ हें ऐकून श्रीकृष्ण ह्मणाला, हे नारदऋषे, अमृतमय अशा चंद्राला गणनाथानें कोणत्या कारणास्तव शाप दिला हें उत्तम आख्यान जसें पूर्वीं झालें असेल तसें मला सांगण्याविषयीं आपण योग्य आहांत ॥ ७७ ॥

ाण०

।२८।

कृष्णाचें भाषण ऐकून नारद ह्मणाला, जेव्हां गणनायक प्रकट झाला तेव्हां भगवान् शंकरानें त्याला सर्व गणांचें आधिपत्य दिलें आणि अणिमा, महिमा, लघिमा, गरिमा, ॥ ७८ ॥ प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व व वशित्व, ह्या नांवांच्या ज्या आठ सिद्धि त्या ब्रह्मदेवानें गणपतीला भार्या करून दिल्या ॥ ७९ ॥ व गणपतीची पूजा करून ब्रह्मदेव त्याची स्तुति करूं लागला. ब्रह्मदेव

कथा.

नारदउवाच ॥ गणानामाधिपत्येचरुद्रेणविहितःपुरा ॥ अणिमामहिमाचैव लघिमागरिमातथा ॥ ७८ ॥ प्राप्तिःप्राकाम्यमीशित्वंवशित्वंचाष्टसिद्धयः ॥ भार्यार्थंप्रददौदेवोगणेशस्यप्रजापतिः ॥७९॥ पूजयित्वागणाध्यक्षंस्तुतिंकर्तुं प्रचक्रमे ॥ ब्रह्मोवाच ॥ गजवक्रगणाध्यक्षलंबोदरवरप्रद ॥८०॥ विघ्नाधीश्वर देवेशसृष्टिसंहारकारक ॥ यःपूजयेद्गणाध्यक्षंमोदकाद्यैःप्रयत्नतः ॥ ८१ ॥ ॥

ह्मणाला, हे भगवन् गजवक्रा, गणाध्यक्षा, लंबोदरा, वरदायका ॥८०॥ तूं सर्व विघ्नांचा मुख्य ईश्वर, सर्व देवांचा स्वामी व जगाचे सृष्टिसंहार करणारा असा आहेस. जो मनुष्य मोठ्या प्रयत्नानें मोदकादि अत्युत्तम पदार्थांनीं यत्नानें गणाध्यक्षाची (तुझी) पूजा करितो ॥ ८१ ॥ ॥२८॥

त्यास निर्विघ्नपणानें सिद्धि प्राप्त होते यांत संशय नाहीं. आणि हे गणाध्यक्षा, जे तुझी पूजा केल्यावांचून सिद्धीची इच्छा करितात ते दैत्य किंवा मोठे देवही असले तरी ॥ ८२ ॥ त्यांला कोट्यवधि कल्पशतांनींही ती होत नाहीं. हे गणाध्यक्षा, विष्णूनें तुझी भक्ति केली तिचे प्रभावानें तो जगाचें रक्षण करीत आहे ॥८३॥ तसाच रुद्र विश्वाचा संहार करितो तोही तुझ्याच भक्तीनें आणि तुझ्याच भक्तीच्या प्रभावानेंच मीही जग उत्पन्न करितों. याप्रमाणें ब्रह्मदेवानें

तस्यप्रजायतेसिद्धिर्निर्विघ्नेननसंशयः ॥ असंपूज्यगणाध्यक्षंयेवांछंतिसुरासुराः ॥८२॥ नतेषांजायतेसिद्धिःकल्पकोटिशतैरपि ॥ त्वद्भक्त्यातुगणाध्यक्ष विष्णुःपालयतेसदा ॥ ८३ ॥ रुद्रोपिसंहरत्याशुत्वद्भक्त्यैवकरोम्यहं ॥ इत्थंसंस्तूयमानोसौदेवदेवोगजाननः ॥ ८४ ॥ उवाचपरमप्रीतोब्रह्माणंजगतांपतिः ॥ श्रीगणेशउवाच ॥ वरंब्रूहिप्रदास्यामियत्तेमनसिवर्तते ॥ ८५ ॥

स्तुति केली ती श्रवण करून देवांचा परम देव गजानन ॥ ८४ ॥ जगाचा पति फार संतुष्ट होऊन ब्रह्मदेवाला ह्मणाला, हे विधात्या, मी संतुष्ट झालों आहें तर तुझ्या मनांत जो इष्ट असेल तो वर माग ॥ ८५ ॥

हें ऐकून ब्रह्मदेव ह्मणाला, हे प्रभो, जर प्रसन्न झाला असशील तर मी सृष्टि करण्याचें जें कार्य करीत आहें तें निर्विघ्नपणें सिद्ध होत जावें हा वर दे याप्रमाणें ब्रह्मदेवाची प्रार्थना ऐकून गणनाथानें तुझ्या इच्छेप्रमाणें होईल असा त्याला वर दिला. नंतर हातांत मोदक घेऊन ॥ ८६ ॥ सत्यलोकापासून हळुहळू स्वेच्छेनें आकाशमार्गानें गणराज चालला होता. तो चंद्रलोकांत प्राप्त

ब्रह्मोवाच ॥ क्रियमाणस्यमेसृष्टिर्निर्विघ्नंजायतांप्रभो ॥ एवमस्त्वितिदेवोसौ गृहीत्वामोदकान्करे ॥८६॥ सत्यलोकात्समागत्यस्वेच्छयागगनेशनैः ॥ चंद्रलोकंसमासाद्यस्खलितोगणनायकः ॥ ८७ ॥ उपहासंमहच्चक्रेसोमोरूपमदान्वितः॥ तंदृष्ट्वाकोपताम्राक्षोगणनाथःशशापह ॥ ८८॥ दर्शनीयःसुरूपोहं सुंदरश्चाहमित्यथ ॥ गर्वितोसिशशांकत्वंफलंप्राप्स्यसिसत्वरं ॥ ८९ ॥ ॥

झाला व तेथें त्याला सहज ठेंच लागली व तीमुळें तो खालीं पडला ॥ ८७ ॥ तेव्हां चंद्रानें आपल्या रूपाच्या गर्वानें गणपतीचा मोठा उपहास केला. तो त्याचा उन्मत्तपणा गणनाथाला सहन झाला नाहीं. तत्काल रागानें डोळे लाल करून त्यानें चंद्राला शाप दिला ॥८८॥ गणनाथ

ह्मणाला, अरे चंद्रा, मी मोठा सुरूप आहें व सुंदर दिसतों असा तुझ्या मनांत मोठा गर्व आहे पण याचें फळ तुला लौकरच प्राप्त होईल ॥ ८९ ॥ आजपासून लोक कोणी तुला पाप्याला पहाणार नाहींत, जे मनुष्य मृगलांछन अशा तुला न समजून पाहतील ॥ ९० ॥ त्यांच्यावर खचित खोटा आरोप येईल. याप्रमाणें गणनाथानें चंद्राला भयंकर शाप दिला तो ऐकून जिंकडे-

अद्यप्रभृतिलोकास्त्वांनहिपश्यंतिपापिनं ॥ येपश्यंतिप्रमादेनत्वांनरामृगलांछनं ॥ ९० ॥ मिथ्याभिशापसंयुक्ताभविष्यंतिहितेध्रुवं ॥ हाहाकारोमहान्जातःश्रुत्वाशापंचभीषणं ॥ ९१ ॥ अत्यंतंम्लानवदनोजलेचंद्रःसमाविशत् ॥ कुमुदंकौमुदीनाथस्थितस्तत्रकृतालयः ॥ ९२ ॥ ततोदेवर्षिगंधर्वानिराशोद्विग्नमानसाः ॥ तुरासाहंपुरोधायजग्मुस्तेतंपितामहं ॥ ९३ ॥ ॥

तिकडे मोठा हाहाकार झाला॥९१॥नंतर तो कौमुदीचा नाथ चंद्र अगदीं म्लानमुख होऊन तत्काल उदकांत शिरला आणि तेथेंच रात्रिविकासी कमलाला आपलें राहण्याचें स्थान करून दडून बसला॥९२॥नंतर चंद्र नाहींसा झाल्यामुळें देव,ऋषि,गंधर्व इत्यादि सर्व लोक निराश व उद्विग्नांतःकरण होत्साते इंद्राला पुढें करून ते आपलें दुःख निवेदन करण्याकरितां ब्रह्मदेवाजवळ गेले॥९३॥

ण०

१०॥

त्यांनीं ब्रह्मदेवास नमस्कार करून चंद्राच्या सर्व चेष्टा सांगितल्या आणि गणपतीनें चंद्राला शाप दिला तोही सांगितला ॥९४॥ तेव्हां भगवान् ब्रह्मदेव कांहीं वेळ मनांत विचार करून देवांला असें ह्मणाला, बापा इंद्रा, गणेशाचा शाप दूर करण्याविषयीं कोणाचें सामर्थ्य आहे बरें ॥९५॥ फार काय सांगूं, भगवान् रुद्र किंवा मी अथवा विष्णु यांच्या हातून देखील

कथा.

दृष्ट्वापितामहंदेवंशशंसुश्चंद्रचेष्टितं ॥ दत्तःशापोगणेशेनकथयामासुराद रात् ॥ ९४ ॥ विचार्यभगवान्ब्रह्मातान्सुरानिदमब्रवीत् ॥ गणेशशापो देवेंद्रशक्यतेकेननान्यथा ॥ ९५ ॥ कर्तुंरुद्रेणनमयाविष्णुनाचापिनिश्चि तं ॥ तमेवदेवदेवेशंव्रजध्वंशरणंसुराः ॥ सएवशापमोक्षंचकरिष्यतिनसं शयः ॥९६॥ देवाऊचुः ॥ केनोपायेनवरदोगजवक्रोगणेश्वरः ॥ पिता महमहाप्राज्ञतदस्माकंवदप्रभो ॥ ९७ ॥ ॥ ॥

दूर करवणार नाहीं हें खचित आहे. याकरितां हे देव हो, देवदेवांचाहि ईश जो गणनायक त्यालाच तुह्मी सर्व शरण जा ह्मणजे तो या चंद्राला शापापासून मुक्त करील यांत संशय नाहीं ॥ ९६ ॥ हें ऐकून देव ह्मणाले, हे महाबुद्धिमंता समर्था पितामहा, तो गजवक्र गणेश्वर कोणत्या ॥३०॥

उपायानें आह्मांस वर देणारा होईल तें कृपा करून सांगा ॥ ९७ ॥ असें देवांचें वाक्य ऐकून ब्रह्मदेव ह्मणाला, गणनाथाला आराधन करण्याचा मार्ग ह्मटला ह्मणजे प्रत्येक चतुर्थीचे दिवशीं त्या देवदेवाची नियमानें पूजा करावी. त्यांत विशेषतः कृष्णचतुर्थीचे दिवशीं नक्तव्रत करावें (चंद्रोदयानंतर भोजन करावें)॥९८॥ रात्रौ पूजा करून तुपांत तळलेले मोदक गणपतीस अर्पण

पितामहउवाच ॥ चतुर्थ्यांदेवदेवोऽसौपूजनीयःसदैवहि ॥ कृष्णपक्षेविशेषे णनक्तंकुर्याच्चतद्व्रतं ॥ ९८ ॥ अपूपैर्घृतसंयुक्तैर्मोदकैःपरितोषयेत् ॥ मधुरान्नं हविष्यंचस्वयंभुंजीतवाग्यतः ॥९९॥ स्वर्णरूपंगणेशस्यदातव्यंब्राह्मणायच ॥ शक्त्याचदक्षिणांदद्याद्वित्तशाठ्यंनकारयेत् ॥ १०० ॥ एवंश्रुत्वाचतेसर्वेप्रेष यामासुर्गीष्पतिं ॥ सगत्वाकथयामासचंद्रायब्रह्मणोदितं ॥ १०१ ॥ ॥

करून संतुष्ट करावें. नंतर मौन धारण करून मधुर असें हविष्यान्न आपण भोजन करावें॥९९॥ गणेशाची प्रतिमा सुवर्णाची करावी व पूजा झाल्यावर ती ब्राह्मणाला द्यावी. यथाशक्ति द- क्षिणा द्यावी. सामर्थ्य पुष्कळ असून दक्षिणा थोडी देणें असें करूं नये ॥ १०० ॥ याप्रमाणें

ब्रह्मदेवाचें भाषण ऐकून सर्व देवांनीं बृहस्पतीस तत्काळ चंद्राकडे पाठविला. तेव्हां बृहस्पति चंद्राजवळ जाऊन ब्रह्मदेवानें जें काय सांगितलें होतें तें सर्व चंद्रास सांगता झाला॥१०१॥नंतर जसें पूर्वीं ब्रह्मदेवानें सांगितलें होतें त्याप्रमाणें चंद्रानें भक्तिपूर्वक चतुर्थीव्रत करून गणपतीची आराधना केली तेव्हां तो भगवान् गणनायक त्या व्रताच्या योगानें संतुष्ट होऊन चंद्रापुढें प्रत्यक्ष प्रगट झाला ॥ १०२ ॥ तेव्हां अष्टसिद्धींसहवर्तमान क्रीडा करीत असलेल्या गणनायकाला

व्रतंचक्रेततश्चंद्रोयथोक्तंब्रह्मणापुरा ॥ आविर्बभूवभगवान्गणेशोव्रततोषितः ॥१०२॥तंक्रीडमानंगणनायकंचतुष्टावदृष्ट्वातुकलानिधानः ॥त्वंकारणंकारण कारणानांवेत्तासिवेद्यंचविभोप्रसीद ॥१०३॥ प्रसीददेवेशजगन्निवासगणेशलं बोदरवक्रतुंड ॥ विरिंचिनारायणपूज्यमानक्षमस्वमेगर्वकृतंचहास्यं ॥१०४॥

पाहून तो कलानिधि चंद्रमा अत्यंत नम्र होऊन त्याची स्तुति करूं लागला. चंद्र ह्मणतो, हे भगवन्, तूं सर्व जगताचें कारण असून सर्व कारणांचेंही कारण जाणणारा आहेस. आणि जाणण्याविषयींही योग्य आहेस. तस्मात् हे सर्वव्यापका, प्रसन्न हो ॥ १०३ ॥ हे गणेशा, हे लंबोदरा, हे वक्रतुंडा, हे देवेशा, हे जगन्निवासा, मजवर अनुग्रह कर. ब्रह्मदेव, नारायण इत्यादि

देवांनींही ज्याची पूजा केली आहे असा तूं परम श्रेष्ठ असून पूर्वीं मीं गर्वानें तुझा उपहास केला त्याची क्षमा कर ॥१०४॥ जे तुझी पूजा न करितां आपण केलेल्या कार्याची सिद्धि व्हावी अशी इच्छा करितात, ते मूर्ख आणि सर्व लोकांत अत्यंत दुर्दैवी होत यांत कांहीं संशय नाहीं. हे भगवन् आतां मीं तुझा सर्व प्रभाव जाणला आहे ॥१०५॥ जे तुझ्या सेवेविषयीं उदासीन राहतात ते

येत्वामसंपूज्यगणेशनूनंवांछंतिमूढाःस्वकृतार्थसिद्धिं॥ तेदैवनष्टाविदितंचलो केज्ञातोमयातेसकलःप्रभावः ॥ १०५ ॥ येचाप्युदासीननरास्तुपापास्तेयांति वासंनरकेसदैव ॥ हेरंबलंबोदरमेक्षमस्वदुश्चेष्टितंतत्करुणासमुद्र ॥१०६॥ एवं संस्तूयमानोऽसौचंद्रेणाथगजाननः ॥ गणेश उवाच ॥ तुष्टोऽहंतवदास्यामि वरंब्रूहिनिशाकर ॥ १०७ ॥ ॥ ॥ ॥

पापी लोक नेहमीं नरकवास पावतात. हे हेरंबा, हे लंबोदरा, तूं केवळ करुणासमुद्र आहेस, मीं जें वाईट आचरण केलें त्याची क्षमा कर ॥ १०६ ॥ याप्रमाणें चंद्रानें स्तुति केली, तेव्हां तो गजानन त्याला ह्मणाला, हे निशाकरा, आतां मी तुला प्रसन्न झालों आहें तर तूं मजपाशीं वर माग

॥ १०७ ॥ असें गणेशाचें वचन ऐकून चंद्र ह्मणाला, हे गणेश्वरा, तुझ्या प्रसादेंकरून मी शाप-
निर्मुक्त होत्साता पूर्वींप्रमाणें पुनः लोकांला दर्शनीय व्हावें हेंच मला दे ॥१०८॥ असें चंद्राचें
भाषण ऐकून गणपति ह्मणतो, चंद्रा, तूं यावांचून जो दुसरा वर मागशील तो मी तुला देईन
परंतु हें मात्र देणार नाहीं. याप्रमाणें गणनायक सांगत असतां ब्रह्मादिक सर्व देव भयपीडित

चंद्रउवाच॥ लोकानांदर्शनीयोहंभवामिपुनरेवहि ॥ विशापोऽहंभविष्यामि
त्वत्प्रसादाद्गणेश्वर ॥ १०८ ॥ गणेशउवाच ॥ वरमन्यंप्रदास्यामिनैतद्देयंम
यातव ॥ ततोब्रह्मादयःसर्वेसमाजग्मुर्भयार्दिताः ॥ विशापंकुरुदेवेशप्रार्थया
मोवयंतव ॥ १०९ ॥ विशापमकरोचंद्रंकमलासनगौरवात् ॥ भाद्रशुक्लचतु
र्थ्यांतुयेपश्यंतिसदैवहि ॥ ११० ॥ ॥ ॥ ॥ ॥

होत्साते तेथें येऊन गणपतीला ह्मणाले, हे देवा, आह्मी सर्व देव तुझी प्रार्थना करीत आहों, तर
ह्या चंद्राला तूं शापमुक्त कर ॥१०९॥ असें ब्रह्मादिकांची प्रार्थना ऐकून गणनाथ ब्रह्मदेवाच्या
मानास्तव चंद्रास शापमुक्त करिता झाला. गणनाथ ह्मणाला, चंद्रा, भाद्रपदशुक्लचतुर्थीदिवशीं

जे तुला पाहतील ॥११०॥ त्यांला एक वर्षपर्यंत मिथ्यापवाद प्राप्त होईल यांत कांहीं संशय नाहीं.
जे प्रत्येक महिन्याचे आरंभीं द्वितीयेला तुझें दर्शन करतील ॥ १११ ॥ त्यांला पाप लागणार
नाहीं. नंदिकेश्वर ह्मणतात, हे सनत्कुमारा, याप्रमाणें गणनायकानें वरदान दिलें तेव्हांपासून सर्व
लोक शुक्ल द्वितीयेचे दिवशीं आदरपूर्वक चंद्राचें दर्शन करितात ॥११२॥ गणनाथानें याप्रमाणें

मिथ्यापवादमावर्षंप्राप्स्यंतीहनसंशयः ॥ मासादौपूर्वमेवत्वांयेपश्यंतिसदाज
नाः ॥१११॥ भद्रायांशुक्लपक्षस्यतेषांदोषोनजायते ॥ तदाप्रभृतिलोकोयंद्वि
तीयायांकृतादरः ॥ ११२ ॥ पुनरेवतुपप्रच्छकलावान्गणनायकं ॥ केनोपा
येनदेवेशतुष्टोभवसितद्वद ॥ ११३ ॥ गणेशउवाच ॥ सदाकृष्णचतुर्थ्यांतु
मोदकाद्यैःप्रपूज्यमाम्॥ रोहिण्यासहितंत्वांचसमभ्यर्च्यविधानतः ॥ ११४ ॥

उश्शाप दिला तो श्रवण करून चंद्रानें पुन्हा त्याला प्रश्न केला. चंद्र ह्मणाला, हे भगवन्, कदाचित्
चतुर्थीचे दिवशीं माझें दर्शन झालें असतां जो दोष प्राप्त व्हावयाचा तो कोणत्या उपायानें जाईल
व हे देवेशा, तूं कोणत्या उपायानें प्रसन्न होतोस तें सांग ॥११३॥ हें ऐकून गणेश ह्मणाला, नेहमीं

कृष्णचतुर्थीचे दिवशीं मोंदकादिकांचा नैवेद्य करून जो माझी पूजा करील व तुझ्या उदयानंतर रोहिणीसहित तुझें यथाविधि पूजन करील॥११४॥ व आपल्या सामर्थ्याप्रमाणें माझी सुवर्णाची प्रतिमा करून ब्राह्मणाला देईल व नंतर यथाविधि कथा ऐकून भोजन करील॥११५॥त्याचीं नेहमीं सर्व संकटें मी निवारण करीन. भाद्रपदमासीं शुक्लचतुर्थीचे दिवशीं माझी सुवर्णाची किंवा

यथाशक्त्याचमद्रूपंस्वर्णेनपरिकल्पितं ॥ दत्वाद्विजायभुंजीयात्कथांश्रुत्वाविधानतः ॥ ११५ ॥ सदातस्यकरिष्यामिसंकष्टस्यनिवारणम् ॥ भाद्रशुक्लचतुर्थ्यांतुमृन्मयीप्रतिमाशुभा ॥ ११६ ॥ हेमाभावेतुकर्तव्यानानापुष्पैःप्रपूज्य मां ॥ ब्राह्मणान्भोजयेत्पश्चाज्जागरंचविशेषतः ॥ ११७ ॥ स्थापयेदव्रणंकुंभं धान्योपरिसुशोभितं ॥ यथाशक्त्याचमद्रूपंशातकुंभेनयोजितं ॥ ११८ ॥

शक्ति नसल्यास मृत्तिकेची चांगली प्रतिमा करून तिचें नानाप्रकारच्या पुष्पांनीं पूजन करून ब्राह्मणांला भोजन द्यावें. नंतर रात्रीं विशेष जागरण करावें ॥११६॥११७॥ यथाविधि पूजन करावें ह्मणून जें सांगितलें याचा प्रकार असा कीं, ज्याला छिद्र नसेल असा एक सुशोभित कलश

खालीं धान्य घालून त्यावर स्थापावा. त्याच्यावर यथाशक्ति माझी सोन्याची प्रतिमा करून ठेवावी ॥११८॥ दोन वस्त्रें त्या कलशाभोंवतीं गुंडाळावीं. मोंदकादिकांनीं माझी पूजा करावी. पूजा करणाऱ्या मनुष्यानें त्या वेळीं लाल वस्त्रें धारण केलेलीं असावीं. ब्रह्मचर्ययुक्त शुचि असावें ॥११९॥ सोन्याची प्रतिमा करण्याचें सामर्थ्य नसेल तर रुप्याचीहि करावी. जे मला उपचार

वस्त्रद्वयसमाच्छन्नंमोदकाद्यैःप्रपूज्यमां ॥ रक्तांबरधरोमर्त्योब्रह्मचर्यरतःशुचिः ॥११९॥रजतस्यतुरूपंमेयथाशक्त्याविनिर्मितं॥ शिवायवस्त्रंप्रियायचउपवस्त्रं गणाधिपे ॥ १२० ॥ गंधंलंबोदरायेतिपुष्पंसिद्धिप्रदायच ॥ धूपंगजमुखायेतिदीपंमूषकवाहिने ॥१२१॥ विघ्ननाथायनैवेद्यंफलंसर्वार्थसिद्धिदे ॥ तांबूलं कामरूपायदक्षिणांधनदायच ॥ १२२ ॥

अर्पण करावयाचे त्यांमध्यें शिवप्रियायनमः ह्मणून वस्त्र द्यावें, गणाधिपायनमः ह्मणून उपवस्त्र द्यावें॥१२०॥ लंबोदरायनमः ह्मणून गंध द्यावें, सिद्धिप्रदायनमः ह्मणून पुष्प अर्पावें, गजमुखायनमः ह्मणून धूप व मूषकवाहनायनमः ह्मणून दीप अर्पण करावा ॥१२१॥ विघ्ननाथायनमः यानें

ण०

॥३४॥

कथा.

नैवेद्य व सर्वार्थसिद्धिदायनमः यानें फल, कामरूपायनमः यानें तांबूल आणि धनदायनमः या नांवानें दक्षिणा अर्पण करावी ॥ १२२ ॥ नंतर उंसाच्या कांड्यांनीं व मोदकांनीं नाममंत्रांनीं होम करावा, नंतर विसर्जन करावें. याप्रमाणें केलें असतां सर्व सिद्धि प्राप्त होतात ॥१२३॥ याप्रमाणें यथाविधि विघ्नेशाची पूजा करून व कथा श्रवण करून पुढें सांगितलेल्या मंत्रानें तें

इक्षुदंडैर्मोदकैश्चहोमंकुर्याच्चनामभिः ॥ विसर्जनंततःकुर्यात्सर्वसिद्धिप्रदायकं ॥१२३॥ एवंसंपूज्यविघ्नेशंकथांश्रुत्वाविधानतः ॥ मंत्रेणानेनतत्सर्वंब्राह्मणाय निवेदयेत् ॥ १२४ ॥ दानेनानेनदेवेशप्रीतोभवगणेश्वर ॥ सर्वत्रसर्वदादेवनिर्विघ्नंकुरुसर्वदा ॥१२५॥ मानोन्नतिंचराज्यंचपुत्रपौत्रान्प्रदेहिमे ॥ गावोधान्यं चवासांसिदद्यात्सर्वंस्वशक्तितः ॥ १२६ ॥ ॥ ॥ ॥

पूजापीठ व इतर साहित्य ब्राह्मणाला दान करावें॥१२४॥दानमंत्रार्थ, हे देवेशा, हे गणेशा, ह्या दानानें प्रसन्न हो. हे देवा, सर्व ठिकाणीं, सर्वकाळीं माझीं कार्यें निर्विघ्न होऊं दे॥१२५॥ माझी प्रतिष्ठा वाढूं दे, मला राज्य दे, पुत्र दे, नातू दे, गाई, धान्य आणि वस्त्र इत्यादि सर्व मला दे॥१२६॥

॥३४॥

असा मंत्र ह्मणून यथाशक्ति मिळविलेलें साहित्य ब्राह्मणाला देऊन मौन धारण करून भोजन करावें. जेवणांत मोदक घारगे वगैरे गोड गोड पदार्थ असावेत. खारट आंबट असूं नयेत॥१२७॥ गणराज ह्मणतो, चंद्रा, याप्रमाणें जो माझें व्रत करितो त्याला मीं सर्वदा जय देतों, त्याच्या कार्यांची सिद्धि व धन धान्य व विपुल संपत्तिही मी देतों ॥ १२८ ॥ असें सांगून विघ्नराज भग-

दत्वातुसर्वंब्राह्मणायस्वयंभुंजीतवाग्यतः ॥ मोदकापूपमधुरंलवणक्षारवर्जितं ॥१२७॥ एवंकरोतियश्चंद्रतस्याहंसर्वदाजयं ॥ सिद्धिंचधनधान्यंचददामिविपुलांप्रजां ॥१२८॥ इत्युक्त्वांतर्दधेदेवोविघ्नराजोविनायकः ॥ तद्व्रतंकुरुकृष्ण त्वंततःसिद्धिमवाप्स्यसि ॥ १२९ ॥ नारदेनैवमुक्तश्चव्रतंचक्रेहरिःस्वयं ॥ मिथ्यापवादंनिर्मृज्यततःकृष्णोभवच्छुचिः ॥ १३० ॥ ॥ ॥

वान् गणपति तेथेंच गुप्त झाला. नारद ह्मणतात हे कृष्णा, तूं हें गणराजाचें व्रत कर ह्मणजे तुला सिद्धि प्राप्त होईल ॥१२९॥ नंदिकेश्वर ह्मणतात, हे सनत्कुमारा, नारदानें याप्रमाणें सांगितलें तें श्रवण करून आपल्यावर आलेला मिथ्यापवाद दूर करण्याकरितां कृष्णानें स्वतः हें व्रत केलें

तेव्हां त्याच्या प्रभावानें कृष्णावरचा अपवाद जाऊन तो शुद्ध झाला ॥ १३० ॥ आणि त्या वेळीं गणपति श्रीकृष्णास प्रसन्न होऊन दर्शन देऊन ह्मणाला, कृष्णा, तुझें स्यमंतमणिनामक आख्यान व चंद्राचें सर्व चरित्र जे श्रवण करितील त्यांला मिथ्यापवाददोष कधीं लागणार नाहीं॥१३१॥भाद्रपदशुक्लचतुर्थीचे दिवशीं कदाचित् चंद्राचें दर्शन झालें तर त्या दोषाचा परिहार होण्याकरितां

येशृण्वंतितवाख्यानंस्यमंतकमणीयकं ॥ चंद्रस्यचरितंसर्वंतेषांदोषोनजायते ॥१३१॥ भाद्रशुक्लचतुर्थ्यांतुकचिचंद्रस्यदर्शनं ॥ जातंतत्परिहारार्थंश्रोतव्यंसर्वमेवहि ॥ १३२ ॥ यदायदामनःकष्टंसंदेहउपजायते ॥ तदातदाचश्रोतव्यमाख्यानंकष्टनाशनं ॥ एवमुक्त्वागतोदेवोगणेशःकृष्णतोषितः ॥१३३॥ यदायदापश्यतिकार्यमुत्थितंनारीनरश्चाथकरोतितद्व्रतं ॥सिध्यंतिकार्याणिमनेप्सितानिकिंदुर्लभंविघ्नहरेप्रसन्ने ॥ १३४ ॥ ॥ ॥ ॥

हें आख्यान श्रवण करावें ॥१३२॥ याशिवाय जेव्हां जेव्हां मनाला कष्ट उत्पन्न होतात व संदेह उत्पन्न होतो तेव्हां दुःखनाश करणारें हें आख्यान श्रवण करावें. याप्रमाणें कृष्णाला सांगून त्याच्या व्रताचरणानें संतुष्ट झालेला गणपति जाता झाला ॥१३३॥ नंदिकेश्वर सनत्कुमाराला

ह्मणतात, ज्या ज्या वेळीं स्त्री अथवा पुरुष कांहीं कार्य करण्याला प्रवृत्त होईल त्या त्या वेळीं हें व्रत करून गणनाथाची आराधना करावी ह्मणजे मनांत इष्ट असलेलीं सर्व कार्यें सिद्ध होतात. विघ्ननाश करणारा गणनाथ प्रसन्न झाल्यावर जगामध्यें दुर्लभ ह्मणून काय आहे? ॥ १३४ ॥

इति श्रीस्कंदपुराणे नंदिकेश्वरसनत्कुमारसंवादे स्यमंतकोपाख्यानं संपूर्णम् ॥

इति श्रीस्कंदपुराणे नंदिकेश्वरसनत्कुमारसंवादे स्यमंतकोपाख्यानमहाराष्ट्रभाषार्थः समाप्तः ॥

हें पुस्तक, मुंबईंत 'निर्णयसागर' छापखान्याचे मालक तुकाराम जावजी यांनीं छापून प्रसिद्ध केलें.
शाके १८३६, सन १९१४.

Publisher:— Tukaram Javaji,
Printer:—R. Y. Shedge,
the "Nirnaya-sagar" Press,
23 Kolbhat Lane, Bombay.

इति श्रीसिद्धिविनायकपूजा सार्थकथा ॥

॥७॥